# बहिणाबाईंच्या काव्यातील निसर्गदर्शन व कृषिजीवनातील वास्तव चित्रण

**प्रा.डॉ.गिऱ्हे डी.पी.** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना.

बहिणाबाई चौधरी यांचा जन्म ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबात झालेला आहे. त्यांच्या काव्यातून खानदेशातील शेतकरी आणि खानदेशातील निसर्ग व कृषिजीवन प्रकटते. त्या शेतात राबणाऱ्या कृषिकन्या होत्या शेतातील पिक पाऊसाशी त्यांचं जिव्हाळ्याचं नात होतं. त्यांच्याशीच त्या बोलायच्या सुख दुःखाच्या गप्पा मारायच्या म्हणूनच त्यांना 'निसर्गकन्या' बहिणाबाई म्हटलं आहे.

कवयित्री इंदिरा संत बहिणाबाई विषयी लिहितांना म्हणतात त्या निसर्गकन्या आहेत पण केवळ निसर्ग कन्या नाहीत तर अंकुरा सारख्या रुजल्या वाढल्या. त्या काळ्या आईनेच त्यांच व्यक्तीमत्व घडविले काळ्या आईवर अफाट प्रेम करणारी बहिणाबाईची कविता महाराष्ट्राच्या कृषिजीवनाचा एक आलेखच आहे. मराठीतून शेतकऱ्यांचे जीवन वास्तवरुपात त्यांनी प्रथमच मांडले आहे. बहिणाबाई यांनी पाऊस पडायला लागल्यापासून तर शेतातील पेरणी, कापणी इ. गोष्टी पर्यंत कृषिजीवनाचे वर्णन केलेले आहे.

विशेषतः पाऊस हा शेतकऱ्यांचा जीव की प्राण असतो. पाऊस आल्यावर त्यांचा आनंद गगनात मावेनासा होता. त्यांचं अंतःकरण फुलून येते व निसर्गातील बदल त्याला मोहून टाकतात बहिणाबाईची प्रतिभा फारच आगळी आहे पाऊस पडल्यावर शेतकऱ्याच्या जीवनात धांदल उडते. शेतीची साधने, शेतीची मशागत, आणि त्यातील प्रक्रिया या सर्व घटना त्यांनी काव्यात गुंफल्या आहेत त्या म्हणतात.

आता उगू दे रे शेत
आला पाऊस पाऊस
बऱ्हे येऊ दे रे रोप.

या ठिकाणी पाऊस आलेला आहे शेतकरी आनंदला आहे. धरती पाऊसानं चिंब भिजली आहे. पाऊस शेती, पीक याचा विचार करतांना निसर्गातील पशु पक्षांचा ही बहिणाबाई विचार करतात. तसेच बहिणाबाईंच्या कवितांमध्ये शेतीचं संपूर्ण वर्षाचं चक्र चित्रित केलेलं आहे. पेरणीपासून उफणनीपर्यंत त्यात शेतातल्या सगळ्या कामांचे तपशील आलेले आहेत. या कवितेत शेती करण्यासाठी जी साधनं वापरण्यात येतात त्यांचे सुंदर तपशील आलेले आहेत.

आऊत आऊत आला कमाईले ऊत
कोयपं कोयपं निंदायले सोपं सोपं
मोघडा मोघडा पेरनीचा चवघडा
वखर वखर घाले मायेची पाखर
सरतं सरतं करे पेरतं पेरतं
नांगर नांगर सर्व्या सुखांच आगर

बहिणाबाईने कृषिजीवनाशी निगडीत मोठ्या प्रमाणात काव्य लिहिलं आहे. व कृषिजीवन हेच बहिणाबाईंच्या कवितेचं सामर्थ्य आहे, प्राण आहे. कृषिजीवनात बैलाचं महत्व जास्त आहे. भारतीय संस्कृतीत बैल, कुत्रा, साप, कोकिळ यांची पुजा केली जाते. हे प्राणी शेतकऱ्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहेत. ते त्यांचं रक्षण करतात. या प्राण्यांच्या उपकरातून उतराई होण्यासाठी भारतीय संस्कृतीत त्यांचेही काही सन आहेत. बैलाचा तो पोळा. पोळ्याला शेतकरी

बैलांना सजवितात, त्याला गोडधोड खाऊ घालतात त्याची पुजा करतात व एक दिवस बैलाला विश्रांती देतात त्याच परिस्थितीचे दृष्यात्मक चित्र बहिणाबाईनं काव्यातून सांगितले.

आला आला शेतकऱ्या
पोयाचा रे सन मोठा
हाती घेईसन वाट्या
आता शेंदूराले घाटा

बहिणाबाई शेतकऱ्यांना सुचना देत आहे की, हे शेतकऱ्या आता पोळ्याचा सण अगदी जवळ आला आहे. आता कामाला लागा बैलाला सजवा शेंदूर घोटून बैलाच्या शिंगाला लावा. तसेच बहिणाबाईंची दृष्टी अत्यंत चौफेर होती ते म्हणजे मोटेचे पाणी मळ्यात कसे तान्ह्या बाळासारखे याचे वर्णन त्या करतात.

हुंदडत पानी
जसं तान्ह पायन्यात

शेतात पाणी कसे इकडून तिकडे वाहते जसे की तान्ह्या बाळाला पाळण्यात झोके दिल्यासारखे होय. बहिणाबाई शेतातील आलेली पिक व स्त्रीयांचे काम यावरही कविता लिहितात.

उठा उठा बहिणाबाई
बोंड कपाशीचे वेचा
बोंट हालवा हालवा.
जशा पाखरांच्या चोचा

थोडक्यात पाखरं जशी चोचींन दाने टिपतात त्या प्रमाणे शेतकऱ्यांच्या स्त्रीयांनी कापसाची बोडं पटापट वेचावी असे त्या सांगतात.

बहिणाबाई 'हिरीताचं देनं घेनं' या कवितेत मानवतावादी मूल्यांची जोपासना करायला सांगतात. आपण निसर्गाच्या सानिध्यात राहतो. निसर्गात प्राणी राहतात ते कसे स्वातंत्र्याचा आनंद घेतात त्यांच्यात धन, द्रव्य साठवून ठेवण्याची आशा नसते जी खोटी आहे. त्यांच्यात स्पर्धा नसते त्यांच्यात खोटारडे व्यवहारही नसतात; परंतु माणसामध्ये मात्र या गोष्टी मोठ्या प्रमाणात आढळतात.

पाहीसनी रे लोकांचे, व्यवहार खोटे नाटे,
तव्हा बोरी बाभयीच्या, आले अंगावर काटे

एकंदरीत आपल्या सभोवताली असणाऱ्या माणसांचे वेगवेगळे व्यवहार कशा पध्दतीने होतात याचाच परिणाम म्हणून बोरी आणि बाभळींना काटे आले आहेत असे बहिणाबाई चौधरी यांना वाटते. खरोखर अतिशय चांगली कल्पकता त्यांनी कवितामध्ये निर्माण केलेली दिसते.

अशा प्रकारे बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या विविध काव्यांतून निसर्ग दर्शन व कृषिजीवन यांचे वर्णन केलेले आहे.

संदर्भ :

१. बहिणाबाईंची गाणी एक आस्वाद, प्रा.नरेंद्र मारवाडे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ.क्र.२१, ६८
२. बहिणाबाई ध्यास आणि अभ्यास, इंद्रजीत भालेराव, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र.८८
३. काव्यात्म साहित्य, संपादन - मराठी अभ्यास मंडळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद पृ.क्र.३०